# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 03 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०३ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

दिव्यांगांना बाधामुक्त वातावरण निर्माण करून देणं, याला समाजाचं प्राधान्य द्यावं, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. आज आंतरराष्ट्रीय दिव्यांग व्यक्ती दिनानिमित्त दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान सोहळ्यात त्या बोलत होत्या. दिव्यांगांना सहजता आणि समानतेची वागणूक देणं हे समस्त मानवतेचं कर्तव्य असल्याचं प्रतिपादन त्यांनी केलं.

यावेळी एकूण २२ व्यक्ती आणि ११ संस्थांना राष्ट्रपतींच्या हस्ते गौरवण्यात आलं. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी अनेक कल्याणकारी उपक्रमांचा शुभारंभ देखील यावेळी करण्यात आला, यामध्ये ब्रेल लिपीतल्या पुस्तकांच्या पोर्टलचा समावेश आहे.

****

दरम्यान, केंद्र सरकारनं सुरु केलेल्या सुगम्य भारत, सुलभ भारत अभियानाला आज नऊ वर्ष पूर्ण झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिव्यांग लोकांचा स्वाभिमान वाढवण्यासाठी २०१५ मध्ये 'दिव्यांग' शब्द वापरण्यास सुरुवात करण्याचं आवाहन केलं होतं. 'सुगम्य भारत अभियान' आणि 'एक देश, एक सांकेतिक भाषा' यांसारख्या पावलांमुळे दिव्यांगांच्या जीवनात बदल घडून आला आहे. आता त्यांना समान संधी, शिक्षण आणि रोजगार मिळत आहेत. कल्याण इथं राहणारे शंकर साळवे यांनी दिव्यांगत्वामुळे आलेल्या अनेक अडचणींवर सुगम्य भारत अभियानातून मिळालेल्या विविध सुविधांच्या माध्यमातून मात केली, त्यामुळे त्यांनी पंतप्रधानांचे आभार मानले...

***"सुगम्य भारत अभियानाचं माध्यमातून आमचे लाडके पंतप्रधान महोदय यांनीं आमचे दिव्यांग बंधु भगिंनींसाठी खूप चांगल्या सुविधा उपलब्ध करून***

***दिल्या. गेल्या २० वर्षापूर्वीचा जर इतिहास पाहिला तर आज आम्हाला जे मतदान केंद्र बघतो ते पूर्वी आम्ही त्या ठिकाणी आम्हाला कोणीतरी उचलून घेऊन जाऊन, खुर्चीवर उचलून घेऊन जाऊन त्याठिकाणी मतदान करायचं. आज प्रत्येक मतदान केंद्रावर रॅम्पची सुविधा आहे. व्हिलचेअर आहे आणि ज्या काही दिव्यांगांना लागणारी सोयीसुविधा उपलब्ध आहे, ते आपले सुगम्य भारत अभियानाचं माध्यमातून सर्व ठिकाणी उपलब्ध करून दिलेल्या आहेत."***

✻✻✻✻

देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांची आज जयंती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजेंद्र प्रसाद यांना अभिवादन केलं आहे. देश संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करत असताना राजेंद्र प्रसाद यांचं जीवन आणि आदर्श प्रेरणादायी असल्याचं, पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

✻✻✻✻

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज चंदीगढ दौऱ्यावर असून, तीन नव्या फौजदारी कायद्यांच्या यशस्वी अंमलबजावणीतील प्रगतीबद्दल ते माहिती देत आहेत. सुरक्षित समाज, विकसित भारत: शिक्षेकडून न्यायाकडे, असा या कार्यक्रमाचा मुख्य विषय आहे. या कायद्यांचा व्यवहारात वापर कसा करता येईल, याच्या प्रात्यक्षिकांची मोदी यांनी पाहणी केली.

✻✻✻✻

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज मुंबई दौऱ्यावर असून, केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या शतकमहोत्सवी समारंभाला ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते शतकमहोत्सवी स्तंभाचं उद्घाटन होईल.

✻✻✻✻

परवा सहा डिसेंबरला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८वा महापरिनिर्वाण दिन आहे.

या निमित्त, मुंबईत चैत्यभूमी इथं येणारी अनुयायांची संख्या पाहता, मध्य रेल्वेतर्फे विशेष नियोजन करण्यात आलं आहे. रेल्वे पोलीस दल आणि रेल्वेच्या व्यावसायिक विभागाकडून, दादर आणि नजीकच्या रेल्वे स्थानकांवर, जवळपास अतिरिक्त १०० रेल्वे पोलीसांची नियुक्ती केली जाणार आहे. या पोलिसांमार्फत, प्रवाशांना मदत केली जाईल, तसंच त्यांच्या मार्फत, रेल्वे स्थानकांवर- मदत कक्षही उभारण्यात येणार आहेत.

दरम्यान, चैत्यभूमीवर येणाऱ्या अनुयायांना आवश्यक त्या सोयी – सुविधा प्रशासनामार्फत उपलब्ध करून देण्यासाठी सर्वच यंत्रणांनी काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश कोकण विभागीय आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी दिले आहेत.

****

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिकमधील पंचवटीचा विकास करण्यासठी केंद्र सरकारने ९९ कोटी ३८ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. केंद्रीय पर्यटन मंत्रालयानं नाशिक शहराचा आयकॉनिक पर्यटन स्थळात समावेश केला असून, राम पथ प्रकल्पांतर्गत सीता गुहा, काळाराम मंदिर ते रामकुंड परिसराचा विकास होणार आहे. हा प्रकल्प २०२६ पर्यंत पूर्ण होणार असून आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यामध्ये ते विशेष आकर्षण ठरणार आहे.

****

पुरुष हॉकी कनिष्ठ आशिया कप स्पर्धेत भारत आणि मलेशिया यांच्यात आज उपांत्य फेरीचा सामना होणार आहे. ओमानमध्ये मस्कत इथं आज संध्याकाळी साडे आठ वाजता सामन्याला सुरुवात होईल.

****

फेंगल चक्रीवादळ अरबी समुद्राकडे सरकत आहे. यामुळे कोकण आणि मध्य महाराष्ट्रातल्या काही जिल्ह्यांमध्ये हवामान विभागाने पुढचे दोन दिवस यलो अलर्ट जारी केला आहे. उद्या सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यात जिल्ह्यात मुसळधार पाऊस, तर धाराशिव, लातूर, नांदेडसह पुणे, सोलापूर आणि सांगली जिल्ह्यात मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

****